# युवती सभा - अहवाल

दि. ०७ सप्टेंबर २०१७ रोजी युवती सभेचे उद्घाटन संपन्न झाले. या वेळी कार्यक्रमाचे उद्घाटक धुळे येथील एस.एन.डी.टी. महिला महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागातील प्रमुख प्रा.डॉ. सुवर्णा शिंदे उपस्थित होत्या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ज्ञानेश्वर सूर्यवंशी उपस्थित होते. कार्यक्रमात डॉ.सुवर्णा शिंदे यांनी महिला व त्यांच्या समस्या विषयावर मार्गदर्शन केले.

दि. ०९ सप्टेंबर २०१७ रोजी युवती सभेतर्फे महाविद्यालयातील मुलींचे वस्तीगृह येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ज्ञानेश्वर सूर्यवंशी यांनी स्वच्छतेचे महत्व या विषयी मार्गदर्शन केले. यावेळी उपप्राचार्य डॉ.शुभदा रावळ (ठाकरे), उपप्राचार्य प्रा.विजय पवार उपस्थित होते. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व विद्यार्थीनींनी सक्रिय सहभाग नोंदविला.

दि. ०४ आक्टोबर २०१७ रोजी धुळे - मोराणे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय येथे एक दिवसीय कार्यशाळेत महाविद्यालयाच्या १० (दहा) विद्यार्थीनींनी सहभाग नोदविला. यावेळी युवती सभा प्रमुख प्रा.डॉ. मंजू तरडेजा उपस्थित होत्या.

दि. ०२ जानेवारी २०१८ रोजी सावित्रीबाई फुले जयंती निमित्त निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेत स्त्री सक्षमीकरण व सावित्रीबाई फुलेचे योगदान, सावित्रीबाई फुले व आजची स्त्री, सावित्रीबाई फुले : मी स्वयंसिध्दा, मी सावित्री बोलतेय असे विषय देण्यात आले होते. निबंध स्पर्धेत विद्यार्थी विद्यार्थीनींनी सहभाग नोंदविला. स्पर्धेचे परिक्षण महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागातील सहायक प्राध्यापक डॉ. सुजाता गायकवाड यांनी केले.

दि. ०३ जानेवारी २०१८ रोजी महाविद्यालयात स्वयंसिध्दा अभियान जागृती करण्यात आली व विद्यावर्धिनी स्वसंरक्षण कसे करावे. त्याकरिता कराटे प्रशिक्षणाची व क्रिडा क्षेत्रात सहभागी होण्याची माहिती देण्यात आली.

दि. ०३ जानेवारी २०१८ रोजी स्वयंसिध्दा सप्ताह अीयान काय्रक्रमाचे उद्घाटन संपन्न झाले कार्यक्रमाचे उद्घाटक विद्यावर्धिनी सभेचे विश्वस्त मा. जे.टी.देसले उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर सूर्यवंशी उपस्थित होते. युवती सभा प्रमुख डॉ. मंजू तरडेजा व सदस्य डॉ. आशा काटे यांनी सप्ताहात कशा पध्दतीने कार्यक्रमाचे आयोजन केले आहे या बद्दल माहिती दिली. कार्यक्रमास विद्यार्थिनी मोठया संख्येन उपस्थित होत्या.

दि. ०९ जानेवारी २०१८ रोजी स्वयंसिध्दा अभियान सप्ताहाचे समापन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी जयहिंद महाविद्यालयाच्या शिक्षिका प्रा.शारदा पाटील उपस्थित होत्या या अभियानात विद्यार्थिनींना स्वसंरक्षण करण्याकरीता प्रा.संदीप बाविस्कर यांनी कराटे प्रशिक्षण दिले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापिका व उपप्राचार्य डॉ. शुभदा रावळ (ठाकरे), डॉ. सुनंदा ठाकरे, डॉ. पुष्पा गावीत, डॉ.जयश्री गावीत, डॉ. सुजाता गायकवाड,डॉ. मंजू तरडेजा,डॉ आशा काटे उपस्थित होत्या.

दि. २४ जानेवारी २०१८ रोजी भाऊसाहेब ना. स. पाटील साहित्य व मु. अ. वाणिज्य महाविद्यालय (एस.एस.व्ही.पी.एस) महाविद्यालयात व्यक्तिभाव विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत महाविद्यालयातील ०७ ( सात) विद्यार्थीनींनी सहभाग नोंदविला.

दि.२३ जानेवारी २०१८ रोजी महाविद्यालयाचा कला महोत्सव निमित्त साडी डे स्पर्धा, रांगोळी स्पर्धा , पाककला स्पर्धेत विद्यार्थिनींनी सक्रीय सहभाग नोंदविला.धुळे महानगर पालिका धुळे महापौर महिला मॅरेथॉन २०१८ **एक धाव ----** स्त्रीत्वाच्या सम्मानासाठी तसेच **बेटी बचाओ** आणि **स्त्री भ्रूणहत्या** रोखण्यासाठी जनजागृतीच्या उद्देशाने दि. ०८ मार्च २०१८ रोजी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने २० विद्यार्थीनी व ०८ शिक्षकांचे सहभाग घेतला.

| | | |
|---|---|---|
| प्रा.डॉ. मंजू तरडेजा<br>युवती सभा प्रमुख | डॉ. आशा काटे<br>सदस्य | डॉ.डी. एस. सूर्यवंशी<br>प्राचार्य<br>PRINCIPAL<br>VIDYA WARDHINI SABHA'S ARTS, COM. & SCI. COLLEGE, DHULE |

Scanned with CamScanner